Literacy for a Billion

Movie: Aadimaya Aadishakti
Year: 2009

Song: Jai Amba Tu Jagdamba
Lyricist: Vishwanath Evalekar

आ...
जय अंबा तू जगदंबा
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
जय अंबा तू जगदंबा

आ...
दक्षिण काशी कोल्हापूर
आले भेटीला विश्वेश्वर
पंचगंगा तीर्थ महान
शक्तीपीठ पहिलं स्थान
दक्षिणकाशी कोल्हापूर
आले भेटीला विश्वेश्वर
पंचगंगा तीर्थ महान
शक्तीपीठ पहिलं स्थान
सगुणा त्रिगुणा तू अंबिका
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
जय अंबा तू जगदंबा

कोऱ्या मूळ भूमी ठाई
तुझा तांदळा रेणुका माई
माहूरगड पावन होई
परशुरामा भेटली आई

कोऱ्या मूळ भूमी ठाई
तुझा तांदळा रेणुका माई
माहूरगड पावन होई
परशुरामा भेटली आई
एकविरा दुर्गा रमा यल्लमा
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
जय अंबा तू जगदंबा

आ...
बाळाघाट दरी कपारी
अष्टभुजा तुळजापुरी
अनुभूतीचा क्षण भारी
आईभवानी संकट हारी
बाळाघाट दरी कपारी
अष्टभुजा तुळजापुरी
अनुभूतीचा क्षण भारी
आईभवानी संकट हारी
जगदंबा तुळजामाता स्मरी शिवबा
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
जय अंबा तू जगदंबा

सप्तश्रृंगी गडावरी
अर्ध्यापीठाचं स्थान जरी
अंबाबाई जागृत खरी
मुनी मार्कंड ध्यान करी

सप्तश्रृंगी गडावरी
अर्ध्यापीठाचं स्थान जरी
अंबाबाई जागृत खरी
मुनी मार्कंड ध्यान करी
चामुंडा चंडिका काली अंबा
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा

आदिमाया आदिशक्ती करी कृपा
जय अंबा तू जगदंबा
जय अंबा तू जगदंबा
जगत् जननी तुझी दिव्यप्रभा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा
आदिमाया आदिशक्ती करी कृपा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*